# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०१७.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी होणे संभवते.कसलाही धाक, दडपण, उपदेश सहन होत नसावा असे वाटते. "वरून कीर्तन, आतून तमाशा " अशा प्रकारचे आचरण होणे संभवते. या राशीची लहान मुले तर सध्या अतिशय व्रात्य, हूड झाली असावीत, असेही दिसते. अनारोग्य, गैरसमज, अपमान, स्वार्थ प्रवृत्ती अशापैकी कारणांनी कुटुंबात सतत अस्वस्थ परिस्थिती निर्माण होणे संभवते. कुमार्गी मित्रांमुळे धननाश होणे, अनारोग्य होणे संभवते. जपा. शिवाय आर्थिक समस्या, आर्थिक घोटाळे, आर्थिक नुकसान अशापैकी कारणानी आर्थिक समस्या त्रस्त करतील. जपा. पण शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. व दिलासा मिळेल. मंगळ-बुध हे शत्रू ग्रह युतीत असल्याने संततिविषयक समस्या त्रस्त करतील. मुले मनाविरुद्ध वागतील, मुलांचे आजार त्रस्त करतील, त्यामुळे या काळात परीक्षा असतील तर आजारपणामुळे अभ्यासावर परिणाम होईल. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीचे अनारोग्य, काहींना पोटविकाराचा आजार, तर काहींना वियोगाचे दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. पण सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे विवाहेच्छूचे विवाह ठरतील. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. काहींना धनलाभ तर काहींना पुत्रप्राप्ती होणे संभवते. तसेच काहींचे नवे मित्रसंबंध निर्माण होतील. अष्टम स्थानी शत्रूराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे अपेक्षाभंग होणे, कर्ज असेल तर त्यात वाढ होणे, असमाधानकारक घटना घडणे, क्वचित कोणास मोठा आजार होणे अशापैकी असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. जपा. महिन्याचा अखेरचा सप्ताह बरा जाईल. श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** विशेष करून या राशीच्या मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच बऱ्याच प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईल. तरीही या संपूर्ण महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींनी सतत सावधानतेने व विचारपूर्वक आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. ढोंगी आचरण करू नका. शत्रुराशीतील शनि ग्रह विविध कारणांनी वैवाहिक जीवनात बाधा निर्माण कारीलसे दिसते. काही मंडळीना जीवनसाथीच्या व स्वत:च्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. काहीना कुसंगतीची बाधा होणे संभवते. असमाधानकारक घटना घडणे, अपेक्षाभंग होणे, मन सतत अस्वस्थ व बेचैन राहणे असे अनुभव येतील. तसे अनुभव आल्याचे कळविल्यास बरे वाटेल. व्ययस्थानी असलेला हर्षल ग्रहही मनस्तापदायक असणार आहे. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याच्या पूर्वार्धात घरीदारी प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करतच काळ व्यतीत करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सर्वांनाच काळ सुखकारक होईल. केवळ वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, मानसोपचार तज्ज, द्रव पदार्थाचे व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व सुखकारक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी कर्क या चंद्राच्या राशीतील राहू मन उत्साही, हरहुन्नरी राखील . त्यामुळे हातून एखादे कर्तृत्वसंपन्न कार्य घडू शकेल. पण याच राहूमुळे काही मंडळींच्या बंधुसुखात बाधा येणे संभवते. काहींना कोर्ट प्रकरणाशी मुकाबला करावा

लागेल. जपा. कौटुंबिक जीवनात गैरसमज, भांडणतंटे, असमाधानकारक घटना, काहींना राहत्या जागेची समस्या तर काहींना स्थावरसंबंधीची समस्या त्रस्त करील. पण बुध-शुक्र या शुभ ग्रहांची अनुकुलता असल्याने शेतीवाडी असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. मित्रसुख मिळेल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना करा. " ओम नम: शिवाय " मंत्राचा दररोज नियमितपणे एक माळ जप करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होणार आहे. महिन्याच्या पूर्वार्धात मनस्थिती खंबीर राहील. जिद्द वाढेल, महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून काही कर्तबगारी घडणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही भाग्यवान मंडळींना भूमिलाभ होणे संभवते. तसेच काहीना मानाचे स्थान प्राप्त होणे संभवते. कर्तृत्वामुळे काहींना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. जन्मकुंडलीत योग असेल तर काहींना धनलाभ होणेही संभवते. पण एकंदरीत विचार करता कुटुंब स्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या बहुतेक मंडळींना आर्थिक चिंता त्रस्त करीलसे दिसते. जीवनसाथीला अति कष्ट, परिश्रम करावे लागतील. कुटुंबात विविध कारणांनी भांडणे, वाद, विरोध होणे संभवते. जपा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अनारोग्य, नियोजित कार्यात अडथळे येणे, कौटुंबिक त्रास, भांडणे, वाढता खर्च अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. महिन्याच्या उत्तरार्धात संततिसमस्या त्रस्त करतील. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. प्रिय जनांपासून दूरत्व निर्माण झाल्यास अस्वस्थ व्हाल. जपा. असमाधानकारक घटना घडणे संभवते. काही मंडळींना राहत्या जागेची तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. पण शेती व्यवसाय असणारांना उत्तरार्ध लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व प्रगतिकारक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. शिवाय अपघात भय आहे. जपा. वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना, तसेच लोखंड, कोळसा व्यापार असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. काही मंडळींना त्वचारोगाचा तर काहीना मुखदंत रोगाचा आजार त्रस्त करील. अध्यात्माची आवड असेल तर उपासनेद्वारा मन शांत व स्थिर राहू शकेल. काहींना सूचक स्वप्ने पडतील; तर काहींना परदेशवारीची संधी प्राप्त होईल. श्रद्धेने "शिवोपासना " करा. दररोज नियमितपणे "ओम नम:शिवाय" मंत्राची एक माळ जप करा.

**(४) कर्क -** या महिन्याच्या काळात या राशीच्या काही मंडळींना उष्णता विकाराचा तर काहींना वातविकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. राहूमुळे अपमानास्पद घटना घडणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्या त्रस्त करतील. अकल्पितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या कशा
पूर्ण करावयाच्या याची चिंता त्रस्त करील. येणारे धन केव्हा येईल ते सांगता येणार नाही; पण द्यावे लागणारे धन कसे देणार याची चिंता त्रस्त करेल. त्यासाठी अधिक कष्ट, दगदग कराल तर शारीरिक उष्णता भडकून डोळे, घसा, मान, दाढा अशापैकी कसला तरी विकार त्रस्त करील. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुख लाभेल; धैर्य, हिम्मत वाढेल. नोकरदार मंडळींना मात्र महिन्याचा पूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. काहींना बढती, काहींना मानाचे स्थान तर

काहींना एखादे उच्च पद मिळणेही संभवते. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण नातलगांपैकी कोणाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेप्रमाणे होतील. पण विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात यांत्रिक तांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांना तसेच लोखंड, कोळसा विक्रेत्यांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, राजकारणी, मुत्सद्दी मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. केतुमुळे दांपत्य जीवनातील सुखात थोडी बाधा येऊ शकेल. जपा. जलभय असल्याने नौका विहार करू नका, जपून पोहा. तसेच विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. मन:शांतीसाठी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(५) सिंह -** आपल्या अहंकारी आणि अधिकारशाही स्वभावावर नियंत्रण ठेवलेत व संयम आणि सहनशीलतेने आचरण केलेत तर काळाची प्रतिकुलता सुसह्य होईल. व शुक्राच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. हट्टाला पेटून अकारण श्रम, दगदग करू नका. नोकरदार मंडळीना नोकरीत या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. तेव्हा सहनशील व्हा व नम्रतेचे आचरण करा. तेच सुखाचे होईल. शारीरिक उष्णता भडकून काहींना नेत्रविकाराचा तर काहीना घसा, दाढा, मान यापैकी कशाचा तरी आजार त्रस्त करील. जपा. महिनाच्या उत्तरार्धात आर्थिक समस्या त्रस्त करतील. देणे द्यावेच लागेल; पण येणे वसूल होणे कठीण अशी अवस्था होणे संभवते. अशा परिस्थितीत अनपेक्षित खर्च निर्माण होणे संभवते. जपा. त्याशिवाय आर्थिक फसवणूक होणे ही संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. प्रवासाचे योग संभवतात. पण भावंडाकडून त्रास दिला जाणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना मातेबाबतची चिंता त्रस्त करील; तर काहींना गृहसौख्य लाभणार नाही. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात संतति समस्या त्रस्त करीलसे दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे व राहूमुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा उत्पन्न होणे संभवते. पण या राहूमुळे काहींना आर्थिक लाभ होतील' तर काहींना परदेशवारीची संधी मिळेल. तसेच हितशत्रूपासून रक्षण होईल. षष्ठ स्थानी असलेल्या केतूमुळे काहींच्या हातून एखादे सत्कार्य होणे संभवते. स्वतंत्र व्यावसायिकांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. त्याचप्रमाणे भाग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळेही काहींना दूरच्या प्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणाराना हा हर्षल अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. श्रद्धा असेल तर गायत्री उपासना करा. “ गायत्री मंत्रा”चा दररोज नियमितपणे एक माळ जप करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. तसेच काही मंडळीना काल्पनिक चिंता त्रस्त करील. मनस्थिती अस्थिर, चंचल राहील. काही मंडळींना फसवणूक झाल्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. रवि-मंगळ दोन्ही प्रखर उष्ण, तापट, अहंकारी ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे.

जपा. काही मंडळींना जुन्या दबलेल्या प्रक्ररणाचा पुन्हा त्रास सुरू होईल. जपा. आर्थिक चिंता, भांडणे, गैरसमजुती, आर्थिक नुकसान अशापैकी घटनांनी अस्वस्थ व्हाल. पण मनावर व बुद्धीवर ताबा ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण केलेत तर होणारा असह्य मनस्ताप सुसह्य होईल. रक्तदाब, हृदयविकार अशी दुखणी असणारांनी तर प्रयत्नपूर्वक सहनशील बनून , मन शांत ठेवून प्रतिकुल काळाशी मुकाबला केला पाहिजे. तरच गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद उपभोगू शकाल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ घटना घडतील. स्वतंत्र व्यापार, व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होईल, आर्थिक प्रगती होईल. शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. त्यामुळे सुखशांती लाभेल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काहींना मनपसंत उत्तम नोकरी लागेल. काहींना मनपसंत कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण हाच शनि ग्रह एखादी भावंडविषयक चिंता त्रस्त करीलसे दिसते. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अशा या प्रतिकुल काळात सतत सावधानतेने आचरण करणे आवश्यक होईल. कारण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघात भय संभवते. जपा. राहू-केतू विविध कारणांनी संततिसुखात बाधा निर्माण करतील. नोकरीत असणारांनी आपल्या हाती असलेल्या अधिकाराचा दुरुपयोग करू नये. अंगाशी येईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेया ची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** वक्री शनि ग्रहामुळे या राशीच्या मंडळींना काही काळ जो प्रतिकुल होता, त्यापैकी या महिन्याचा काळ अखेरचा आहे. पुढील महिन्यापासून या राशीची मंडळी शनि ग्रहाच्या साडेसातीतून मुक्त होणार आहेत. सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असावी, असे वाटते. म्हणून अध्यात्माची मनापासून ओढ असेल तर त्यांनी मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून, संयमाने, सहनशीलतेने व नम्रतेने आचरण करून आध्यात्मिक उपासनेत या महिन्याचा काळ व्यतीत करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. तेच सुखाचे होईल. कारण एकूण सर्वच ग्रहस्थिती या महिन्यात प्रतिकुल असणार आहे. केवळ गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व थोडासा दिलासा मिळेल. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-शनि आणि उत्तरार्धात रवि-मंगळ- शनि-हर्षल हे पूर्णपणे प्रतिकुल होणार असल्याने कौटुंबिक सुखाचे दृष्टीने, गृहसौख्याचे दृष्टीने, नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने, वैवाहिक जीवनाच्या दृष्टीने सतत मनस्तापच सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील गैरसमज, वाद, भांडणे आदी कारणांनी वैवाहिक सुखात बाधा येईल. जपा. तसेच आर्थिक चिंता, कुटुंबात घडणाऱ्या
अनिष्ट घटना, जुनी दबलेली काही प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन होणारा मनस्ताप, मानहानी होणे, मित्रांशी वितुष्ट येणे, घरात कोणाशी न पटणे, कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा मनस्ताप होणे, भागीदारीत व्यापार.व्यवसाय असेल त्याच्या भागीदारीत विविध कारणांनी बाधा निर्माण होणे, काहींना कुसंगतीची बाधा होणे अशापैकी घटना घडणे संभवते. जपा. विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. गुरु ग्रह संततिसुखाचे दृष्टीने व बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांसाठी अनुकुल होईल. शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडणे , काहींना महिन्याच्या पूर्वार्धात मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन शांत, स्थिर व खंबीर राहू शकेल. हनुमानचालिसा स्तोत्राचे दररोज नियमितपणे पठण करा.

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आणि त्यात शनि ग्रह वक्री**.** त्यामुळे काळ प्रतिकुल आहे याची जाणीव ठेवूनच सतत मनावर ताबा ठेवून, सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करूनच प्रतिकुल काळ व्यतीत करा. तेच सुखाचे होईल. स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. नियोजित कार्यात अडथळे निर्माण होणे, कुटुंबातील प्रिय जनांचे दूरत्व होणे, त्यामुळे नैराश्य येणे, व्यवसायात खळबळजनक घटना घडणे, अपेक्षाभंग होणे अशा प्रकारच्या घटनांनी अस्वस्थ व्हाल. जपा. अकारण अति विचार करू नका. काही मंडळींना डोकेदुखीचा तर क्वचित कोणास मेंदूविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होऊ शकेल. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. अध्यात्म आणि समाजकार्य यांची आवड असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व सुखसमाधान देणारा असेल. पण शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात अडचणी, अडथळे, मनस्ताप यांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. जपा. या राशीच्या युवकांना हातचे सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी तसे करू नये. मनावर ताबा ठेवून मोहाला बळी न पडता आहे ती नोकारीच मनापासून करावी. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्राच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील. क्वचित कोणास मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना, यांत्रिकतांत्रिक उद्योगव्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** शत्रू राशीत शनि आणि त्यात शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ आर्थिक चिंता आणि शारीरिक-मानसिक अनारोग्य यांच्याशी मुकाबला करण्यातच व्यतीत करावा लागेलसे दिसते. म्हणून या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींनी मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवून, संयमाने आचरण करून व सहनशील बनून काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. सर्व आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक, योग्य असल्याची खात्री करूनच करा. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत भावनाशील झाले असेल तर सतत मनस्ताप व संघर्ष यांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असला तरी वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. जपा. तसेच कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता आहे. उच्च बौद्धिक, शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक असल्याचा अनुभव येईल. महिन्याचा उत्तरार्ध कलाक्षेत्रातील मंडळीना अनुकुल व सुखाचा होईल. काहींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या युवकयुवतीची प्रेमप्रकरणे असतील तर ती सफल होणे संभवते. कल्पनारम्य साहित्य निर्मितीसाठी काळ अनुकूल होईल. अध्यात्म ,गूढविद्या यांत रस असणारांना उपासनेद्वारे पुढील मार्ग सापडणे शक्य होईल. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. पण प्रवासात त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या युवकांना काही तरी नवीन करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी हातचे सोडून काही नवीन करण्याचा प्रयत्न करू नये. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस

काळ अनुकूल होईल. वैवाहिक जीवनात समजूतदारपणे वागूनच सुखसमाधान मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा .

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना सध्या शारीरिक-मानसिक जडत्व आले असावे, असे वाटते. त्यामुळे काही करू नये, ऐशारामात राहावे असे वाटत असावे, असे वाटते. मनात सतत खळबळ चालली असून कोणत्याही परिस्थितीत सुखसमाधान लाभत नसावे. कोणाशी पटत नसावे, सतत साध्यासाध्या गोष्टीवरून तक्रारी करत असाल असे वाटते. राहत्या जागेत स्वस्थता लाभत नसावी, असे वाटते. याचे कारण आर्थिक चिंता असावी. शिवाय घरीदारी, नोकरी-व्यवसायाचे ठिकाणी कामाचा ताण, मानहानी, वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास अशापैकी काहीतरी असावे, असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. बौद्धिक, शैक्षणिक, शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणाराना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण उष्णताविकारांनी अनारोग्य होणे संभवते. काहींना मूळव्याधीचा आजार त्रस्त करील; तर काहींना डोळे तळावणे, हातापायाची आग होणे अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. शिवाय या काळात सतत सावधानतेने आचरण करा. दुखापत होणे, हाडमोड होणे संभवते. तसेच वीज, पाणी यापासून धोका असल्याने जपा. शनि ग्रहामुळे संततिविषयक समस्या मनस्ताप देण्याची शक्यता आहे. तसेच राहूमुळे दाम्पत्यजीवानातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे काहींना भूमिलाभ तर काहींना मानाचे स्थान वा प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. काहींना गुरुकृपा प्राप्त होईल श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल . दररोज नियमितपणे श्रीगणपति अथर्वशीर्ष व हनुमानचालिसा स्तोत्राचे श्रद्धेने पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मानसिक स्थिती अत्यंत कोमल झाली असल्याचे जाणवते. स्वभाव अतिशय लहरी झाला असावा, असेही वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असाव्यात असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. तसे होत असल्यास कळवा. बरे वाटेल. पण सध्या या राशीच्या मंडळींना उच्च प्रकारची बौद्धिक शक्ती प्राप्त झाल्याचेही जाणवते. तसेच वृत्ती चौकस, उत्तम स्मरणशक्ती व आकलनशक्ती प्राप्त झाली असल्याचेही जाणवते. त्यामुळे कठीण कठीण समस्या त्यांच्याकडून अगदी सहज सोडवल्या जात असल्या पाहिजेत. तसे असेल तर कळवा. आनंद वाटेल. पण मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने महिन्याच्या पूर्वार्धात वैवाहिक जीवनातील कटकटी, जीवनसाथीचे अनारोग्य, काहींना कुसंगातीची बाधा, कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा मनस्ताप, भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल तर त्यात निर्माण होणाऱ्या समस्या अशापैकी कारणांनी मनस्थिती अस्वस्थ होत असावी, गहरे नैराश्य येत असावे व त्यामुळे अनुकुल बौद्धिक क्षमतेचा उपयोग हातून होत नासावा, असे वाटते. त्यात भर म्हणून महिन्याच्या उत्तरार्धात स्वत:च्या अनारोग्याची भर पडेल असे वाटते. जपा. अकारण संतापू नका. उष्णता विकार बळावतील . रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना सतत मनस्ताप देणाऱ्या घटना त्रस्त करतील. पण शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून

मधून मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. परधर्मियांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे काही लाभदायक गोष्टी प्राप्त होतील. शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर काहींना भूमिलाभ तर काहींना मानाचे स्थान वा प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. गुरु ग्रहामुळे अध्यात्माची आवड असणारांना आध्यात्मिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. संततिसुख मिळेल. लोखंड, कोळसा व्यापार असणारांना काळ लाभदायक होईल. काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन स्वस्थ राहील.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय चंचल, लहरी झाला असून त्यांच्याकडून अविचाराने नको इतका खर्चही होत असावा, असे वाटते. त्याचप्रमाणे त्यांचे बोलणे फटकळ व अविचाराचे होत असण्याची शक्यताही जाणवते. त्यामुळे समोरचा माणूस अकारण दुखावला जात असण्याची शक्यताही दिसते. मनावर संयम नसल्याने विचित्र आचरणही होत अस्ण्याची शक्यता दिसते. राहूमुळे संततिसुखात बाधा येते का? पण या राहूमुळे दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना आर्थिक लाभ होत असले पाहिजेत. मंगळ ग्रह वैद्यकीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना अनुकुल व प्रगतिकारक तसेच यशदायक होईल; पण होणारे वाद, भांडणे मिटवता आले नाहीत तर नियोजित कार्यात अडथळे निर्माण होतील. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात काही मंडळीना पोटविकाराचा आजार त्रस्त करील; तर काही मंडळीना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच काही मंडळींना रक्तविकाराचा आजार त्रस्त करील, तर काहींना ताप येणेही संभवते. चोरीची घटना घडणेही संभवते. जपा. अपघाताचे भय असल्याने या राशीच्या मंडळींनी सतत सावधानतेचे आचरण करावे. महिन्याच्या उत्तरार्धात वैवाहिक जीवनात दोघांपैकी कोणाचे तरी अनारोग्य, दोघांतील वाद, भांडणे अशापैकी कारणानी वैवाहिक सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. अविचारी आचरणामुळे काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्ध भावनेच्या भरात भरकटत जाणारा असल्याचा अनुभव येईल. पण ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचा योग असेल त्यांना असा अनपेक्षित धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होणेही संभवते. दूरच्या प्रवासाचे योग येतील. ही गुरु दत्तात्रेयांच्या मालकीची राशी असल्याने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

======oooooOooooo======